श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

| वर्ष-६, अंक-१अ | जानेवारी-२०१८ | विनामूल्य खासगी वितरणासाठी | विशेषांक, पाने १२ |

## 'गुरुमहात्म्य' पुरस्काराने श्री. विकासराव वालावलकर सन्मानित

पुण्यातील लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्त मंदिर ट्रस्टचे १२०वे वर्ष, प.पू. नानामहाराज तराणेकर यांचे १२१वे जयंती वर्ष व अखिल भारतीय त्रिपदी परिवाराचा रौप्य महोत्सव असा तिहेरी योग या वर्षी जुळून आला. त्या निमित्ताने 'लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्त मंदिर ट्रस्ट' व 'अखिल भारतीय त्रिपदी परिवार' यांच्या वतीने विशेष कार्य करणाऱ्या विविध क्षेत्रातील नामवंत व्यक्तींना 'गुरुमहात्म्य पुरस्कार' प्रदान करण्यात आले. धार्मिक व सामाजिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टची पुरस्कारासाठी निवड जाहीर करण्यात आली होती.

दि. १.१२.२०१७ या दिवशी विधान परिषदेचे सभापती मा. श्री. रामराजे निंबाळकर यांच्या हस्ते; पालकमंत्री श्री. गिरीष बापट, धर्मादाय आयुक्त शिवकुमार डिगे, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टचे अध्यक्ष श्री. अशोक गोडसे आदींच्या उपस्थितीत श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टचे प्रमुख विश्वस्त मा. श्री. विकासराव कमलाकर वालावलकर यांनी ट्रस्टच्या वतीने बालगंधर्व रंगमंदिर, पुणे येथे हा सन्मान स्वीकारला.

या वेळी वरिष्ठ पोलीस अधिकारी श्री. विश्वास नांगरेपाटील यांना सामाजिक सलोखा व युवा प्रेरणा पुरस्कार व डॉ. रणजित जगताप (हृदयशल्य विशारद) यांना वैद्यकीय क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्यासाठी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

सत्काराला उत्तर देताना मा. विकासराव वालावलकर यांनी ट्रस्टच्या आजवरच्या कामाचा थोडक्यात आढावा घेऊन, श्रीसहजानंदसरस्वती महाराजांची या कार्यामागील भूमिका आणि त्यांचे द्रष्टेपण गर्दीने ओसंडून वाहणाऱ्या प्रेक्षागारातील श्रोत्यांना विशद केले. वालावलकर रुग्णालयाने मागास भागात गोरगरीब जनतेसाठी उपलब्ध करून दिलेल्या विविध आरोग्य सेवांविषयी सर्वच मान्यवर वक्त्यांनी गौरवोद्गार काढले.



*डावीकडून सर्वश्री विश्वास नांगरेपाटील, डॉ. रणजीत जगताप, विधानपरिषद सभापती मा.रामराजे निंबाळकर, सत्कारमूर्ती विकासराव वालावलकर, पालकमंत्री मा. गिरीश बापट, अंकुश काकडे, शिवकुमार डिगे इ.*

# डेरवण क्रीडासंकुलात टी ५५ अनुराग रणगाडा विराजमान

## निवृत्त लेफ्टनंट कर्नल विराज लाड यांच्या शुभहस्ते उद्‌घाटन



१९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्धात पंजाब सीमेवर महत्त्वाची कामगिरी बजावणारा 'टी ५५ अनुराग' हा रणगाडा भारतीय सैन्यदलाकडून डेरवण येथील श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित इंग्रजी माध्यमाच्या शाळेला प्रदान करण्यात आला आहे. या रणगाड्याचे उद्‌घाटन निवृत्त लेफ्टनंट कर्नल विराज लाड, फोर्थ बटालियन जम्मू आणि काश्मिर रायफल्स, यांच्या हस्ते दिमाखात करण्यात आले. या सोहळ्याला निवृत्त मेजर जगन्नाथ आंबरे, एस.व्ही.जे.सी.टी.चे प्रमुख विश्वस्त श्रीकाका महाराज, नामांकित ऑर्थोपेडिक सर्जन डॉ. पवनकुमार कोहली, डेरवण हॉस्पिटलच्या मेडिकल डायरेक्टर डॉ. सुवर्णा पाटील, इंग्लिश मिडियम स्कूलच्या डायरेक्टर सौ. शरयू यशवंतराव व स्पोर्ट्स डायरेक्टर श्री. श्रीकांत पराडकर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात झेंडावंदन आणि राष्ट्रगीत गायनाने झाली. त्यानंतर प्रमुख पाहुणे लेफ्टनंट कर्नल विराज लाड यांनी फीत कापून 'टी ५५ अनुराग' रणगाड्याचे उद्‌घाटन केले. या वेळी श्री. अरुण मिराशी यांनी बिगुलाची धून वाजवून सुरेल साथ दिली. रणगाडा शाळेच्या आवारात स्पोर्ट्स अकॅडमी येथे बसविण्यामागची भूमिका स्पष्ट करताना शाळेच्या संचालिका सौ. शरयू यशवंतराव यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांना या युद्ध-प्रतिकाकडे बघून सतत आपल्या वीर जवानांच्या त्यागाची व शौर्याची आठवण राहील आणि त्यातून स्फूर्ती घेऊन हे विद्यार्थी सैन्य दलात दाखल होऊन आपल्या भारतमातेच्या रक्षणासाठी सज्ज राहतील.

टी ५५ अनुराग रणगाडा भारतीय सैन्य दलाकडून प्राप्त करण्यात महत्त्वाची भूमिका बजावणारे डॉ. पवनकुमार कोहली यांनी आपले मनोगत व्यक्त करताना, ही वॉर-ट्रॉफी इथे आणण्याचा हेतू सर्वांमध्ये देशप्रेम जागृत होऊन पुन्हा नवी क्रांती घडावी हाच आहे असे सांगितले.

निवृत्त लेफ्टनंट कर्नल विराज लाड यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले, ''आजचा दिवस आपणा सर्वांना अतिशय महत्त्वाचा आहे कारण १९६० सालापासून भारतीय सैन्य दलात कार्यरत असणारा आणि १९६५ व १९७१च्या युद्धातील विजयचिन्ह 'टी ५५ अनुराग' हा रणगाडा आपल्या संस्थेच्या क्रीडांगणावर आदरपूर्वक स्थापन करण्यात आला आहे. कोकणातील तमाम सैनिकांच्या शौर्य व हौतात्म्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी

सैन्य दलाकडून श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट, डेरवणला हा रणगाडा समर्पित करण्यात येत आहे. गतकालीन युद्धात आपल्या शूर सैनिकांनी दाखविलेल्या साहस व त्यागाचे स्मरण सातत्याने हा रणगाडा आपल्याला करून देईल तसेच तरुण पिढीला सैन्य दलात दाखल होण्यासाठी प्रवृत्त करेल.

टी ५५ अनुराग रणगाड्याने १९६५ व १९७१ या दोन्ही युद्धांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे. भारत पाकिस्तान सीमेवर पंजाबमधील फझिल्का जिल्ह्यात व राजस्थान या दोन्ही ठिकाणी या रणगाड्याने युद्ध केले आहे. या रणगाड्यावर १०० मि.मि. तोफ बसविलेली असून ती १४ कि. मी.च्या पल्ल्यातील लक्ष्य साधू शकते. तसेच विमानांना लक्ष्य करण्यासाठी मशिनगन्सही बसविल्या असतात. ड्रायव्हर, कमांडर, गनर व लोडर असे चार अधिकारी रणगाड्यावर स्वार असतात.

मी स्वत:ला खूप भाग्यवान मानतो कारण १९७१ साली भारतीय सैन्यातील पायदळाला विशेष प्रशिक्षण देण्यात आले त्यात आम्हाला हा रणगाडा चालविण्याचे प्रशिक्षण मिळाले आणि म्हणून आज या युद्धशस्त्राचे उद्घाटन करताना मला अतिशय आनंद होत आहे.

माझे शिक्षण ११ वी मॅट्रिकपर्यंत चिपळूणला झाले. त्यानंतर मी सैन्यात १९६३ साली शिपाई म्हणून भरती झालो. प्राथमिक सैनिकी शिक्षण सिकंदराबाद येथे झाल्यावर नंतर आर्मी ऑर्डिनन्स स्कूल जबलपूर येथे क्लेरिकल प्रशिक्षण पार पडले व माझी नियुक्ती COD देहू रोड, पुणे येथे झाली. पुढील वाटचालीसाठी मी आर्मी कॅडेट कॉलेजमध्ये प्रवेश घेऊन चार वर्षे पुढील सैनिकी शिक्षण व पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर IMA मध्ये प्रवेश घेऊन तेथील प्रशिक्षणात उत्तीर्ण होऊन फोर्थ बटालियन जम्मू आणि काश्मिर रायफल्समध्ये सेकंड लेफ्टनंट म्हणून रुजू झालो व भारतीय लष्करात अधिकारी पदावर पुढे २० वर्षे असे एकूण ३३ वर्षे भारताचे संरक्षण करण्याचे कर्तव्य मला बजावता आले. १९६५ आणि १९७१ च्या दोन्ही युद्धात मी सहभागी होतो तसेच नागालँड येथेही सेवा बजावण्याचे भाग्य मला लाभले. आता माझा मुलगा मेजर या पदावर कार्यरत आहे.

लष्करी पेशाचे २४ तास देशसेवा करण्याबरोबरच अन्य अनेक फायदेही आहेत. एक म्हणजे तुमचे व्यक्तिमत्त्व शिस्तबद्ध व सर्वकाळ कर्तव्यदक्ष असे तयार होते. निवृत्तीनंतरही आरोग्य सुविधा व अन्य अनेक गोष्टी शासनामार्फत सवलतीच्या दरात पुरविल्या जातात. मात्र लष्कर सेवेसाठी तुम्ही शारीरिकदृष्ट्या धडधाकट असणे आवश्यक असते. तरुण मुलीही पदवी शिक्षण झाल्यावर सर्व्हिस सिलेक्शन बोर्डाची परीक्षा उत्तीर्ण होऊन सैनिकी प्रशिक्षणानंतर लष्कर सेवेत दाखल होऊ शकतात. तरुण मुले NDA, UPSC परीक्षांच्या माध्यमातून तसेच NCC प्रमाणपत्र, अभियांत्रिकी पदवी, पदव्युत्तर पदवी, कायद्याची पदवी प्राप्त केलेले युवकही सैन्य दलात भरती होऊ शकतात.

पुन्हा एकदा ही वॉर ट्रॉफी आपल्या संस्थेने प्राप्त केल्याबद्दल श्रीकाका महाराज यांचे मी अभिनंदन करतो. कारण ही ट्रॉफी मिळविणे सहजसाध्य नाही. जयहिंद!"

यानंतर सर्व उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका सौ. जान्हवी चाळके यांनी केले. कार्यक्रमाला संस्थेच्या विविध शैक्षणिक शाखांचे विद्यार्थी, कर्मचारी, हॉस्पिटलचे डॉक्टर्स, पालक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



*निवृत्त लेफ्टनंट कर्नल विराज लाड यांच्या शुभहस्ते रणगाड्याचे उद्घाटन*



*निवृत्त लेफ्टनंट कर्नल विराज लाड अध्यक्षीय भाषण करताना*



प्रमुख पाहुणे निवृत्त लेफ्टनंट कर्नल विराज लाड यांच्या हस्ते ध्वजारोहण




प्रेक्षकांकडून मानवंदना




डॉ. पवनकुमार कोहली उपस्थितांना संबोधित करतांना



व्यासपीठावर सौ. शरयू यशवंतराव, डॉ. पवनकुमार कोहली, निवृत्त लेफ्टनंट कर्नल विराज लाड, निवृत्त मेजर जगन्नाथ आंबरे, डॉ. सुवर्णा पाटील



सौ. शरयू यशवंतराव प्रास्ताविक भाषण करताना




*क्रीडासंकुलात विराजमान झालेला टी/५५ अनुराग रणगाडा आता सर्वांच्या औत्सुक्याचा विषय झाला आहे!*



*निवृत्त मेजर जगन्नाथ आंब्रे यांचा सत्कार करताना सौ. शरयू यशवंतराव*



*समारंभाला उपस्थित प्रेक्षकवर्ग*

# नवीन मल्टिपर्पज हॉलचे उद्घाटन

## ''... आध्यात्मिकता या संस्थेच्या कानाकोपऱ्यात भरून राहिली आहे...''

**– मा. श्री. नवल बजाज**

श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट, डेरवण येथे नवीन बांधलेल्या मल्टिपर्पज हॉलचे उद्घाटन कोकण विभागाचे स्पेशल इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस मा. श्री. नवल बजाज यांच्या प्रमुख उपस्थितीत दि. १४.१२.२०१७ रोजी करण्यात आले. दीप प्रज्ज्वलनानंतर संस्थेचे विश्वस्त श्री. बाळासाहेब काजरेकर यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांचे स्वागत आणि सत्कार करण्यात आला. प्रथम श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टच्या इंग्लिश मिडियम स्कूलच्या संचालिका सौ. शरयू यशवंतराव यांनी शाळेतील विद्यार्थ्यांच्या विविध क्षेत्रातील प्रावीण्याचा आलेख कथन केला. डॉ. सौ. सुवर्णा पाटील, वैद्यकीय संचालिका यांनी वालावलकर रुग्णालयातील अद्ययावत सुविधा व आरोग्य सेवेचा आढावा उपस्थितांसमोर मांडला. डॉ. पवनकुमार कोहली यांनी आज होणारे हे उद्घाटन म्हणजे पोलिसांच्या 'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' या उक्ती समवेतच 'रोग निवारणाय' आहे असे मनोगत व्यक्त केले.

''मी काही दिवसांपूर्वी नाशिकमध्ये होतो. नाशिकजवळ त्र्यंबकेश्वरला आम्ही सायकलिंग करायचो. तिथे जाण्याआधी रस्त्यावर मोठमोठे फलक असायचे 'श्रीक्षेत्रामध्ये तुमचे स्वागत आहे.' मला आज तसेच वाटते आहे की मी आज एका श्रीक्षेत्रामध्ये प्रवेश केला आहे. डॉ. कोहली यांनी सांगितले ते बरोबर आहे की माझे येथे येणे हा केवळ योगायोग नाही, ही परमेश्वराची इच्छा आहे, म्हणून मला आज या श्रीक्षेत्रामध्ये येण्याची संधी मिळाली. तुम्ही सर्व अत्यंत भाग्यशाली आहात की तुमचे सर्व पालनपोषण, शिक्षण, देखभाल या श्रीक्षेत्रामध्येच होत आहे. मी असे जाहीरपणे सांगतो की, आध्यात्मिकता या संस्थेच्या कानाकोपऱ्यात भरून राहिली आहे. तुमच्या या संप्रदायाचा भारतभर विस्तार व्हावा आणि



*भव्य मल्टिपर्पज हॉल*

सर्वत्र अशा प्रकारचे वातावरण तयार करावे.'' अशी आपल्या भाषणाची सुरुवात करून समारंभाचे अध्यक्ष, कोकण विभागाचे स्पेशल इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस मा. श्री. नवल बजाज आपल्या भाषणात पुढे म्हणाले,

''आजच्या शिक्षण प्रणालीमध्ये दुर्दैवाने दोन गोष्टींचा अभाव जाणवतो. पहिली म्हणजे (Nation building) राष्ट्रघडण. आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पहिली २५-३० वर्षे आपण राष्ट्रबांधणीबद्दल बोलत होतो. पण त्यानंतर कोणत्याही मूलभूत शिक्षणामध्ये आपण राष्ट्राबद्दल न बोलता आधी आपल्या धर्माबद्दल, जातीबद्दल किंवा प्रदेशाबद्दल बोलतो आहोत. जिचा अभाव दिसतो अशी दुसरी गोष्ट म्हणजे चारित्र्य घडण (character building). राष्ट्र घडविण्यासाठी प्रथम चारित्र्य घडविले पाहिजे. माणसाचे चारित्र्य कसे असले पाहिजे याचे शिक्षण आज विद्यार्थ्यांना मिळताना दिसत नाही.

इंग्रजीमध्ये एक म्हण आहे, If wealth is lost, nothing is lost. If health is lost, something is lost; but if character is lost, everything is lost. या संस्थेत जेवढे प्रशिक्षणार्थी आहेत त्या सर्वांना इथे जी महत्त्वाची देणगी मिळेल ती म्हणजे character – चारित्र्य! कारण इथे फिरताना, प्रत्येक गोष्ट बघताना, प्रत्येक माणसाशी बोलताना असं वाटतं की ही व्यक्ती एका वेगळ्याच रसायनाने बनली आहे (he is made of a different material). त्यांच्यात चारित्र्य आहे आणि एकदा तुमच्या चारित्र्यात सामर्थ्य आले की तुम्ही जग जिंकू शकता. डॉ. कोहली म्हणाले होते की इथे आल्यामुळे आपल्याला आपला वेळ वाया गेला असे वाटणार नाही, आणि ते खरे ठरले!



*मा. श्री. नवल बजाज दीप-प्रज्वलन करताना*



*मा. श्री. नवल बजाज प्रेक्षकांना संबोधित करताना*

आरोग्य, औषधोपचार ही मूलभूत गरज आहे. १३ व्या शतकात एका रोमन लेखकाने म्हटले आहे, Healthy mind in healthy body. आपण Healthy body साठी हॉस्पिटल आणि मेडिकल कॉलेज उभारले. Healthy mind साठी आपण शाळा आणि खेळाचे मैदान दिले. इथे आरोग्य, शिक्षण आणि खेळ यांचा संगम आहे. अतिशय विचारपूर्वक आखलेला आणि अंमलात आणलेला हा सर्व प्रकल्प आहे. माणसाच्या संपूर्ण सर्वांगीण विकासासाठी ही संस्था काम करीत आहे.

मोठमोठ्या शहरांमध्ये असे ट्रस्ट स्थापन करण्याचा हेतू काही वेळा दिखाऊपणाचा असतो. परंतु रत्नागिरीच्या एका तालुक्यातील कोपऱ्यामध्ये अशा प्रकारच्या संकल्पना राबविणे, सुविधा आणणे यासाठी जी मानसिकता, सामाजिक बांधिलकी व चिकाटी लागते त्याबद्दल श्रीकाका महाराज, त्यांचे गुरू व या आदर्शांचे अनुसरण करणाऱ्या त्यांच्या समस्त अनुयायी वर्गाची स्तुती करावी तेवढी थोडी. तुम्ही येथे इतके चांगले काम करीत आहात की तुम्हाला पोलिसांची गरज पडणार नाही. परंतु आपल्याला भविष्यात कधीही सरकारी यंत्रणेचा जर सहयोग पाहिजे असेल तर आपण नक्की आमची आठवण काढा. एकदा कोणीतरी महात्मा गांधीजींना विचारले की तुम्हाला पोलिसांची गरज आहे काय? तर ते म्हणाले, माझ्या समाजाला पोलिसांची गरज नाही, पण जर पोलीस असतीलच तर ते सुधारक म्हणून असावेत. पोलिसांचे फक्त चोराला पकडण्याचे काम नाही तर चोराला पकडून त्याच्या मनातील चोर काढून त्याला एक चांगला माणूस करण्याची जबाबदारी पोलिसांची आहे.

बोलणे खूप सोपे असते पण दूरदृष्टी ठेवून चांगल्या संकल्पना अंमलात आणणे फार कठीण असते. तुमच्या संस्थेमध्ये ते सामर्थ्य आहे! तुमच्या संस्थेतील चारित्र्यवान व पवित्र विचार असलेल्या विद्यार्थ्यांनी शक्यतो आमच्या पेशात यावे कारण पोलीस हे समाजचक्राचे केंद्रबिंदू असतात. ज्यांच्या हाती कायदा व सुव्यवस्था आहे, ते जर चांगल्या विचारांचे (चारित्र्यवान) असतील तर समाजामध्ये ते शांती प्रस्थापित करतील. तेव्हा येथे उत्तम संस्कार झालेल्या व्यक्तींनी शासकीय यंत्रणेत येऊन समाजमनामध्ये आमूलाग्र नैतिक बदल करावेत.



*श्रीकाकामहाराज पाहुण्यांना संस्थेविषयी माहिती देताना*

एक गोष्ट सांगून तुमची रजा घेतो. पंजाबमध्ये गुरू नानकदेव एकदा एका उत्तम गावात गेले. तेथील लोक सगळ्यांशी चांगले वागत, चोऱ्या, मारामारी, भांडणे करीत नसत. त्या ठिकाणच्या लोकांनी सांगितले की, बाबा तुम्ही आम्हाला आशीर्वाद द्या. गुरू नानकदेवांनी आशीर्वाद दिला की, 'यह गाँव उजड जाए ।' त्यानंतर ते दुसऱ्या गावी गेले. तिथे क्रूर प्रवृत्तीचे, मारामारी करणारे, शांती नसलेले लोक होते. तेथील लोकांना गुरुदेवांनी आशीर्वाद दिला की, 'यह गाँव हमेशा बसा रहे ।' त्याबद्दल गुरू नानक यांना विचारले असता त्यांनी सांगितले की, चांगले लोक गावातून बाहेर पडून जिथे-जिथे जातील त्या-त्या ठिकाणी चांगला समाज निर्माण करतील. जो चांगलेपणा एका गावामध्ये सीमित आहे तो सगळीकडे पसरेल! आणि जे वाईट लोक आहेत त्यांना एका गावातच डांबून ठेवले पाहिजे!

तेव्हा मी असे म्हणतो की, या ट्रस्टच्या लोकांनी इथे जोपासलेला त्यांचा चांगुलपणा, नेक चारित्र्य त्यांनी बाहेर जाऊन पसरावे. मला इथे आमंत्रित करून सन्मानित केल्याबद्दल श्रीकाका महाराज आणि डॉ. कोहली यांचा मी आभारी आहे. आज अशा चांगल्या लोकांचा सहवास मला लाभला याचा मला अतिशय आनंद आहे.''

अध्यक्षीय भाषणानंतर बालवाडीच्या विद्यार्थ्यांनी एक नृत्य सादर केले तर प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी योगनृत्य सादर केले. कार्यक्रमाची सांगता 'वन्दे मातरम्' या राष्ट्रगीतगायनाने झाली. शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीम. उज्ज्वला जुन्नरकर यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली व शिक्षिका सौ. जान्हवी चाळके यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमाला संस्थेचे मुख्य विश्वस्त श्रीकाका महाराज, श्री. बाळासाहेब काजरेकर, संस्थेच्या सर्व विभागात कार्यरत असलेले शिक्षक, डॉक्टर, परिचारिका, विद्यार्थी व इतर मान्यवर उपस्थित होते.



मा. श्री. नवल बजाज यांना रुग्णालय तसेच संस्थेच्या विविध कार्याविषयी माहिती देताना डॉ. सुवर्णा पाटील




संस्थेचे विश्वस्त श्री. बाळासाहेब काजरेकर यांच्या हस्ते मा. श्री नवल बजाज यांचा सत्कार




मेडिकल डायरेक्टर डॉ. सुवर्णा पाटील सभेला संबोधित करताना



डॉ. पवनकुमार कोहली आपले विचार व्यक्त करताना



Visitor's Book

| Date | Name & Address / E-mail | Phone | Remarks |
|---|---|---|---|
| 14/12/17 | Spirituality pervades every nook and corner of This Institution. May their tribe grow and spread across the country. I am absolutely overjoyed after this visit. | | NAWAL BAJAJ<br>I.G.- Konkan Range<br>Konkan Bhawan<br>Navi - Mumbai. |

अध्यात्मिकता या संस्थेच्या कानाकोपऱ्यात,
रंध्रारंध्रात भरून राहिली आहे.
त्यांच्या या संप्रदायाचा भारतभर विस्तार व्हावा
ही सदिच्छा. मी येथे येऊन, आणि हे सर्व पाहून
अत्यंत आनंदित झालो आहे.
श्री नवल बजाज
इन्स्पेक्टर जनरल कोकण विभाग,
कोकण भवन, नवी मुंबई.

Spirituality pervades every nook and corner
of this Institution. May their tribe grow
and spread across the country.
I am absolutely overjoyed after this visit.
Mr. Nawal Bajaj , Inspector General,
Konkan Range,
Konkan Bhawan, Navi Mumbai.

मा. श्री. नवल बजाज यांनी नोंदविलेला अभिप्राय



*मेडिकल डायरेक्टर डॉ. सुवर्णा पाटील, मा. श्री. नवल बजाज आणि श्रीकाकामहाराज मेडिकल कॉलेजची पाहणी करताना*




*मेडिकल कॉलेजची पाहणी केल्यावर मा. श्री. नवल बजाज, श्रीकाकामहाराज आणि डॉ. कोहली चर्चा करताना*



*मा. श्री. नवल बजाज यांनी क्रीडासंकुलातील शूटींग रेंजमध्ये लक्ष्यभेद केला तो क्षण !*



*स्पोर्ट्स डायरेक्टर श्रीकांत पराडकर मा. श्री. नवल बजाज यांना नेमबाजीचे 'कॉश्चुम' दाखविताना*




*बालवाडीच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेले नृत्य*

# वरिष्ठ वैज्ञानिक डॉ. अरविंद नातू यांचे विद्यार्थी आणि शिक्षकांना मार्गदर्शन

इंडियन इन्स्टिट्युट ऑफ सायन्स एज्युकेशन ॲन्ड रिसर्च (IISER) पुणे या संस्थेतील प्राध्यापक आणि वरिष्ठ वैज्ञानिक डॉ. अरविंद नातू यांचे "Exploring new opportunities in pure science" या विषयावर श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित इंग्रजी माध्यमाच्या शाळेत इ. नववी ते बारावीतील विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले होते. डॉ. नातू यांच्या हस्ते शाळेसमोर वृक्षारोपण करून कार्यक्रमाला सुरुवात झाली.

शाळेच्या विज्ञान प्रदर्शनाच्या उद्‌घाटनानंतर त्यांनी सर्व विज्ञान प्रतिकृतींचे निरीक्षण केले आणि प्रयोग सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रश्न विचारून, चर्चा करून मार्गदर्शन केले. यानंतर माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी मूलभूत विज्ञानातील शैक्षणिक, संशोधनात्मक आणि करिअरच्या संधी याविषयी मार्गदर्शन केले. संशोधन म्हणजे सूक्ष्मदर्शक घेऊन प्रयोगशाळेत बसणे नव्हे तर डोळसपणे निसर्ग आणि नैसर्गिक प्रक्रियांचे निरीक्षण करणे, त्यामागचे कारण जाणून घेण्याचा प्रयत्न करणे आणि त्याचा दैनंदिन जीवनातील समस्या सोडविण्यासाठी उपयोग करणे याला संशोधन म्हणतात असे सांगून निसर्गातून कल्पना घेऊन तयार करण्यात आलेल्या आधुनिक यंत्रांची अनेक उदाहरणे त्यांनी सचित्र स्पष्ट केली.

१२वी नंतर ज्यांना चांगले डॉक्टर, इंजिनीअर व्हायचे आहे त्यांनी ती क्षेत्रे जरूर निवडावीत; परंतु बळजबरीने कोणतेही क्षेत्र निवडू नये असा मौलिक सल्ला त्यांनी दिला. IISER या संस्थेतील इंटरडिसिप्लिनरी अभ्यासक्रम, विज्ञानाच्या सर्वच शाखातील जागतिक दर्जाच्या प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली प्रगत संशोधनाच्या सोयी, पुढील शिक्षणासाठी परदेशी विद्यापीठांमध्ये प्रवेश या सर्व बाबींविषयी त्यांनी सखोल माहिती दिली.

IISER या संस्थेत प्रवेश घेण्यासाठी लागणारी प्रवेश परीक्षा, तिची तयारी कशी करावी याविषयी माहिती देऊन त्यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना, शंकांना यथोचित उत्तरे दिली. विज्ञान विषयातील विद्यार्थ्यांना विषयात रुची वाटेल, आवड निर्माण होईल यासाठी सतत वैज्ञानिक उपक्रम राबवून त्यांना क्रियाशील ठेवणे आवश्यक आहे. त्यांना नवनवीन कल्पना सुचणे, त्यांनी सर्जनशील प्रयोग करणे आवश्यक आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांची जिज्ञासा सतत जागृत राहील हे पाहिले पाहिजे असे मत त्यांनी शेवटी व्यक्त केले.



डॉ. नातू यांच्या शुभहस्ते संस्थेच्या आवारात वृक्षारोपण



डॉ. नातू विद्यार्थ्यांबरोबर संवाद साधताना

# स्वसंरक्षणासाठीच्या उपकरणाचा शोध

भ.क.ल.वालावलकर रुग्णालय व ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय, श्रीक्षेत्र डेरवण येथील संस्थेचे ट्रस्टी व माननीय स्पाइन सर्जन डॉ. सुनील नाडकर्णी आणि अस्थिरोग विभागाचे प्राध्यापक डॉ. पवनकुमार कोहली या अस्थिरोग तज्ज्ञांनी महिला, ज्येष्ठ नागरिक, डॉक्टर तसेच इतर नागरिक यांच्यासाठी एक स्वसंरक्षणासाठीचे उपकरण तयार केले आहे. यासाठी पुणे येथे दि. १७.११.२०१७ या दिवशी 'नॅशनल कॉन्फरन्स ऑन सोशल इनोव्हेशन' या संस्थेच्या वतीने त्यांचा प्रमाणपत्र देऊन मा. ना. प्रकाश जावडेकर, केंद्रीय मंत्री, मानव संसाधन मंत्रालय यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



*डॉ. कोहली सत्काराला उत्तर देताना*

वर्षभरातील महत्त्वाच्या व सर्वश्रेष्ठ ६ नवकल्पनांमध्ये या शस्त्राचा समावेश करण्यात आला आहे. श्रीक्षेत्र डेरवण येथील श्रीशिवसमर्थ गडावरील शिवाजीमहाराजांच्या प्रेरणादायक इतिहासावरूनच या डॉक्टरद्वयीने या शस्त्राचे नांव 'भवानी' असे ठेवले आहे.

या उपकरणाची वैशिष्ट्ये –

१) अडचणीत असताना जवळच्या पाच लोकांना तात्काळ मदतीसाठी लघुसंदेश (SMS) पाठविण्याची सुविधा. GPS यंत्रणेद्वारे व्यक्ती ज्या ठिकाणी असेल त्या स्थानाची माहिती त्वरीत मिळते.



*भवानी शस्त्र*



*डॉ. कोहली सत्कार स्वीकारताना*

२) १२ फूट 'पेपर स्प्रे' च्या माध्यमातून लांबून स्वसंरक्षण.

३) सायरन व एल ई डी लाईटच्या साहाय्याने हल्लेखोराच्या डोळ्यात प्रखर प्रकाश टाकून स्वसंरक्षण.

४) समुराय बेटन व इलेक्ट्रिक स्टनरद्वारे जवळच्या अंतरावरील हल्लेखोरापासून स्वसंरक्षण.

भवानी यंत्र शोधण्याचा मुख्य उद्देश म्हणजे नागरिकांच्या मनात असलेली भीती व दहशत कमी करून त्यांना निर्भयपणे, स्वाभिमानाने आणि आत्मसन्मानाने या यंत्राच्या मदतीने जगता यावे असाच आहे असे मनोगत डॉ. सुनील नाडकर्णी व डॉ. पवनकुमार कोहली यांनी या शस्त्राची माहिती देताना व्यक्त केले. या यंत्राला Wall street Journal आणि President House Exhibition चे मानपत्र मिळाले आहे.

आत्मसंरक्षणासाठी वापरण्यास सोपे व सहज कोठेही नेता येईल असे भवानी यंत्राचे संशोधन करून नागरिकांच्या मनातील भीती आणि दहशत घालविण्यास मदत करणाऱ्या या दोन्ही डॉक्टरांचे अभिनंदन !


NCSI
NATIONAL CONFERENCE ON SOCIAL INNOVATION
TISS
PUNE INTERNATIONAL CENTRE
Certificate Of Appreciation
Awarded to
Dr. Pavan Kuldip Kohli
In recognition of the active participation in the Fifth National Conference on Social Innovation, held on 17th November 2017 at Pune.
Dr. Raghunath Mashelkar, President, PIC
Dr Vijay Kelkar, Vice President, PIC
Prof. Anil Gupta, Vice Chairman, NIF
Mr. Prashant Girbane, Director, PIC

**भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र**
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : (०२३५५) २६४१४९ / २६४६३६ / २६४६३७ फॅक्स : (०२३५५) २६४१८१
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com

# कॅफेटेरिया



*'ऑलिम्पिक कॅफे'ची भव्य इमारत*



*'ऑलिम्पिक कॅफे'च्या हॉलची अभिरुचीपूर्ण सजावट*



*मेडिकल डायरेक्टर डॉ. सुवर्णा पाटील यांच्याहस्ते ''ऑलिम्पिक कॅफे'चे उद्घाटन, सोबत डावीकडून श्री. प्रफुल्ल गोडबोले, हृषीकेश काजरेकर, डॉ. नेताजी पाटील आणि अन्य*



*मेडिकल डायरेक्टर डॉ. सुवर्णा पाटील श्रीसहजानंदसरस्वती स्वामी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करताना*





*'ऑलिम्पिक कॅफे'चा प्रशस्त हॉल*

**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्री. विकासराव वालावलकर यांनी मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे-३० येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, जि. रत्नागिरी येथून प्रकाशित केले.
**संपादिका :** डॉ. सौ. सुवर्णा पाटील, **संपादक मंडळ :** श्री. प्रफुल्लराव गोडबोले, सौ. शरयू यशवंतराव, श्री. श्रीकांत पराडकर